# University of Mumbai

परीक्षा विभाग /
कला निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई- ४०० ०९८

क्र. परीक्षा/कला निकाल कक्ष/३४-अ/२०१६

## परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या कला महाविद्यालयांचे प्राचार्य/विभाग प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा/कला निकाल कक्ष / ३४ -अ/ २०१६, दि. २३ ऑगस्ट, २०१६ च्या नुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१६ M.A. (CBSGS) अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

M.A. (CBSGS) (Sem. I- Repeater) (Sem- II, III & IV - Fresh & Repeater) अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in → Exam & Results → examination → Follow the instruction given on the page या वेब लिंक वरून online स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने online अर्ज भरण्याची, Inward करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | महाविद्यालयाने form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | १२/०९/१६ ते २१/०९/१६ | २२/०९/१६ ते २३/०९/१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/- सहित | २२/०९/१६ ते २६/०९/१६ | २७/०९/१६ ते २८/०९/१६ पर्यंत |

**टिप्पणी:-**

१ **M.A. (Sem. I- Fresh) Choice Base System/CBSGS अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा प्रवेश अर्ज भरण्याच्या तारखा नंतर जाहिर करण्यात येतील.**

२ **जे विद्यार्थी श्रेणी सुधारणीसाठी (Grade Improvement) अर्ज करणार आहेत त्यांनी प्रचलीत पद्धतीनुसार परीक्षा प्रवेश अर्ज भरून त्यासोबत सर्व सेमिस्टरच्या (Sem- I, II, III & IV) उत्तीर्ण गुणपत्रिकांच्या छायांकीत प्रती जोडून वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.**

३ **एप्रिल-२०१५ व त्या पुर्वीचे जे विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्यांनी प्रचलीत पद्धतीनुसार परीक्षा प्रवेश अर्ज भरून वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.**

**पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे-संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या संकेतस्थळावर online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी online भरलेले परीक्षा प्रवेश अर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा प्रवेश अर्जाच्या प्रती (Examination form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.**

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दिनांक २६/०९/२०१६ सायंकाळी ६ वाजता Web Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा प्रवेश अर्ज भरता येणार नाही व परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

# University of Mumbai

परीक्षा प्रवेश अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी. जर त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास परीक्षा प्रवेश अर्ज Inward करताना विद्यार्थ्याच्या नावामधील दुरूस्ती करता येईल व इतर दुरूस्तींसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पत्राद्वारे दि ०१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत कळवावे.

जे विद्यार्थी प्रथम सत्र २०१६ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र २०१६ मध्ये होणा-या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता परीक्षा प्रवेश अर्ज भरावा.

तसेच M.A. (CBSGS) (Sem- IV - Fresh) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कामध्ये रु. २५०/- पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (दिवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- mu.ac.in → Exam & Results → examination → follow the instructions given on the page)

स्थळ : मुंबई.
दिनांक: ०९ सप्टेंबर, २०१६

स्था. परीक्षा नियंत्रक